**प्रेसनोट** **दिनांक ०६/०५/२०२५**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी लाचेची मागणी प्रकरणी कारवाई केलेबाबत''**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | शहापुर पोलीस ठाणे, जि.ठाणे<br>गु.र.नं.१४३/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) चे कलम ७ प्रमाणे दिनांक ०६/०५/२०२५ रोजी. |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | लोकसेवक श्री. दत्तात्रेय बांबळे,नायब तहसिलदार वर्ग (२), शहापुर तहसील कार्यालय, जि.ठाणे |
| **आरोपी अटक** | नाही |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | २५,०००/— रू. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ——. |

**थोडक्यात हकीगत:—** यातील तक्रारदार हे जिवदानी देवी संस्थान, विरार या मंदिराचे व्यवस्थापक असुन मंदिर संस्थानाच्या मालकीची मौजे वाशाळा व वेळूक, ता. शहापूर, जि.ठाणे येथे जमिन आहे. सदर जमीनीच्या ७/१२ उताऱ्यामध्ये विश्वस्तांच्या नावात बदल करून सुधारीत ७/१२ उतारे तयार करण्याकरीता तक्रारदार यांनी तहसिलदार शहापूर, जि.ठाणे या कार्यालयास दिनांक ११/११/२०२४ रोजी अर्ज दिला होता. तक्रारदार यांनी ७/१२ उतारा मिळण्यासाठी अधिकार पत्रान्वये मदतनिस नेमला होता. दिनांक १७/०२/२०२५ रोजी मदतनीस यांनी तक्रारदार यांना फोनद्वारे कळविले की, आपले ७/१२ वर नाव बदलण्याचे काम नायब तहसिलदार यांचेकडे सध्या प्रलंबित असून सदर कामाकरीता नायब तहसिलदार यांनी रू. २५,०००/— मागणी केली आहे. तक्रारदार यांना लाचेची मागणी केलेली रक्कम रू. २५,०००/— त्यांना देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १२/०३/२०२५ ला.प्र.वि. पालघर यांचेकडे तक्रार केली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १२/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये **लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे मदतनीस यांच्यामार्फतीने ७/१२ उताऱ्याचे कामाकरता रू. २५,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे मान्य केले तसेच तक्रारदार यांचे समक्ष पुन्हा संभाषणादरम्यान दुजोरा देवुन रू. २५,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी केली असल्याचे व काम झाले नंतर संपर्क करणार असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर लोकसेवक याने तक्रारदार यांच्याशी लाचेच्या रक्कमेकरीता संपर्क साधला नसल्याने आज रोजी श्री. दत्तात्रय बांबळे, नायब तहसिलदार, शहापुर यांचे विरूध्द शहापुर** पोलीस ठाणे, जि.ठाणे येथे गु.र.नं. १४३/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) चे कलम ७ प्रमाणे दिनांक ०६/०५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपासकामी ला.प्र.वि., ठाणे येथे वर्ग करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक अधिकारी — मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**
**मा.श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता :—** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय कक्ष क्र. १०८,
प्रशासकीय इमारत—'ब', जिल्हा मुख्यालय,पालघर—बोईसर रोड, कोळगाव,
ता. जि. पालघर. पिनकोड — ४०१४०४.
संकेतस्थळ :— https://www.acbmaharashtra.gov.in/
ई—मेल :—dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोल फ्री नं.ः :— 1064
दुरध्वनी क्रमांक :— 02525-297297

**( हर्षल चव्हाण )**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर**